# डेमो हाऊस घोटाळा : जिल्हा परिषद बांधकाम विभागातील भयान वास्तव

## एका डेमो हाऊसवर जिल्हा परिषद बांधकाम विभागातून दहा लाख रुपये खर्च

**२६९ स्क्वेअर फुट बांधकामासाठी घरकुल योजनेतून एक लाख २० हजार रुपयांचे अर्थसहाय्य**

**९० दिवस अकुशल मजुरी म्हणून मिळतात २८ हजार रुपये व शौचालयासाठी १२ हजार रुपये असे एकूण एक लाख ६० हजार रुपयांची तरतूद**

**जर डेमो हाऊस करायचे असेल तर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा विभागातून मिळतात तीन लाख रुपयांचे अनुदान, उर्वरित खर्च जिल्हा परिषद स्वत:च्या निधीतून करते**

जिल्हा परिषद परिसरात बांधण्यात आलेले डेमो हाऊस अंदाजे २६९ स्क्वेअर फुट जागेत बांधलेले, २०२३ यावर्षी हे डेमो हाऊस बांधण्यासाठी जिल्हा परिषद बांधकाम विभागाने पाच लाख रुपये खर्च केले होते, त्यात एक रुम, एक किचन आणि छोटे बाथरूम छतावर पत्रे टाकून डेमो हाऊस तयार करण्यात आलेले, पुन्हा त्याच डेमो हाऊसचे उर्वरित काम करण्यासाठी जिल्हा परिषद बांधकाम विभागाने पाच लाखांचा निधी मंजूर करून वर्कऑर्डरही काढले, असा एकूण दहा लाखांचा खर्च एका डेमो हाऊसवर



बीड : डेमो हाऊस तयार करण्यासाठी २०२३ साली पाच लाखांचा निधी जिल्हा परिषदमधून मंजूर करण्यात आला होता. त्या निधीत तयार झालेले घर पहिल्या छायाचित्रात दिसत आहे तर दुसऱ्या छायाचित्रात उर्वरित काम करण्यासाठी पुन्हा पाच लाखांचा निधी जिल्हा परिषदने मंजूर केला. त्यात डेमो हाऊसला रंग मारण्यात आला. खिडकी अन् दरवाजा बसविला, समोरच्या बाजूने दोन छोटे-छोटे शटर बसविले, आतूनही रंगकाम झाले असावे. अशाप्रकारे नंतरच्या पाच लाख रुपयांच्या निधीची विल्हेवाट लावण्यात आली.

**बीड । दिव्य रिपोर्टर**

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा विभागातून घरकुलच्या लाभार्थ्यांना २६९ स्क्वेअर फुट जागेत घरकुल बांधण्यासाठी १ लाख २० हजार रुपयांचे अर्थसहाय्यक दिले जाते. तसेच घरकुल बांधण्यासाठी अकुशल मजूरी म्हणून ९० दिवसांचे २८ हजार रुपये मिळते.त्याशिवाय शौचालय बांधण्यासाठी १२ हजार रुपयांची वेगळी तरतूद आहे. असे एकूण एक लाख ६० हजार रुपये संबंधित विभागातून लाभार्थ्यांना दिले जाते. उर्वरित खर्च लाभार्थ्यांनी करावा अशी तरतूद आहे. घरकुल कसे असावे? यासाठी जिल्हा परिषद परिसरात एक डेमो हाऊस तयार करण्यात आले. या डेमोहाऊसला जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून तीन लाख रुपयांचा निधी देण्यात येतो. उर्वरित काही खर्च जिल्हा परिषद बांधकाम विभाग स्वत: करते. अशाप्रकारे डेमो हाऊस तयार केला जातो परंतु जिल्हा परिषद बांधकाम (पान २ वर)

# बनावट वर्कडन प्रमाणपत्राच्या आधारावर अनेक सुशिक्षित बेरोजगार अभियंतांचा वर्ग ४-५ मध्ये समावेश केल्याची शंका

**नोव्हेंबर २०२५ ते आजतागायत कामाच्या मर्यादा वाढवून दिलेल्या सर्व संचिकांची तपासणी करणे गरजेचे**

**जिल्हा परिषद बांधकाम विभागातील रजिस्ट्रेशन करणाऱ्या त्या कर्मचाऱ्याची कार्यप्रणाली संशयास्पद, मोठा आर्थिक व्यवहार केल्याची शंका**

**इनकम सोर्सचे टेबल मिळविण्यासाठी त्या कर्मचाऱ्याने अधिकाऱ्यांना मॅनेज केल्याचा प्रयत्न केल्याचीही चर्चा असून उच्चस्तरीय चौकशीची गरज**

**बीड । दिव्य रिपोर्टर**

सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांनी जिल्हा परिषद बांधकाम विभागात रजिस्ट्रेशन केल्यानंतर नियमाने वर्गवारीनुसार संबंधित सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना जिल्हा परिषद बांधकाम विभागातून कामे वाटप केली जातात. त्यानंतर संबंधित सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांनी वर्कडन केल्याचे प्रमाणपत्र पाहून त्यांच्या कामानुसार त्यांना वर्ग ४ व वर्ग ५ मध्ये समावेश केला जातो. परंतु जिल्हा परिषद बांधकाम विभागातील काही सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांनी बनावट वर्कडन प्रमाणपत्राच्या आधारावर वर्गवारीमध्ये समावेश करून घेतल्याची शंका असून नोव्हेंबर २०२५ ते आजतागायत कामाच्या मर्यादा वाढवून देण्यासाठी सादर झालेल्या सर्व संचिकांची तपासणी करणे गरजेचे वाटत आहे. विशेष म्हणजे जिल्हा परिषद बांधकाम विभागात रजिस्ट्रेशन करणाऱ्या त्या कर्मचाऱ्याची कार्यप्रणाली संशयास्पद वाटत असून मोठा आर्थिक व्यवहार करून बनावट वर्कडन प्रमाणपत्राच्या आधारावर अनेकांना वर्गवारी करून दिल्याची शंका व्यक्त केली जात आहे.

संबंधित कर्मचाऱ्याने आपल्याला इनकम सोर्सचे टेबल मिळावे म्हणून आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याला मॅनेज करण्यासाठी मोठे आमिष दाखविल्याची चर्चा असून याप्रकरणी जिल्हा परिषद प्रशासनाने उच्चस्तरीय चौकशी करणे गरजेचे आहे. तसेच अशा कर्मचाऱ्याला जबाबदारीचे काम सोपविण्यापूर्वी अधिकाऱ्यांनीही विचार करणे गरजेचे वाटते. तसेच नोव्हेंबर २०२५ ते आजतागायत जिल्हा परिषद बांधकाम विभागात वर्ग ४ व ५ मध्ये समावेश झालेल्या सुशिक्षित बेरोजगार अभियंतांच्या संचिका तपासणी करणे गरजेचे असून काही सुबेअने वर्कडन प्रमाणपत्र बनावट सादर करून वर्गवारीत समावेश करून घेतल्याची शंका व्यक्त केली जात आहे. यापूर्वीही वर्कडन प्रमाणपत्र बनावट असल्याची बाब समोर आली होती. त्याअनुषंगाने पुन्हा बनावट प्रमाणपत्र सादर करून जिल्हा परिषद प्रशासनाची दिशाभुल करण्यात आली का? यासाठी सर्वच वर्कडन प्रमाणपत्राची पडताळणी करणे योग्य आहे.

### कामाची मर्यादा वाढवून घेतलेल्या सर्वच संचिका तपासणे गरजेचे

कामाची मर्यादा वाढवून घेण्यासाठी संबंधित सुबेअ यांनी वर्कडन प्रमाणपत्र व वर्क इन हॅण्ड प्रमाणपत्र दाखल केल्यानंतरच त्यांना कामाची मर्यादा वाढवून देवून वरच्या वर्गात समावेश केला जातो. परंतु काही सुबेअने बनावट वर्कडन प्रमाणपत्र सादर करून कामाची मर्यादा वाढवून घेतल्याची शंका आहे. यासाठी जिल्हा परिषद बांधकाम विभागात कामाची मर्यादा वाढवून घेतलेल्या सर्वच संचिका तपासणी करून घेणे गरजेचे असून याकडे अतिरिक्त सीईओ विलास जाधव यांनी लक्ष देणे गरजेचे वाटते.


सत्यमेव जयते

DIVYA AADHAR

https://epaper.divyaaadhar.com

साप्ताहिक दिव्य आधार



rizwanshaikhekmat33@gmail.com

संपादक : शेख रिजवान मो. 9561840184




ग्राऊंड रिपोर्टींग पान ४ वर


बीड वर्ष १३ वे, अंक २१, सोमवार, दि. १९ जानेवारी २०२६ RNI/MAHMAR/2013/54433 पाने-४ किंमत १ रुपया


# जीएसटी माफीयांनी केलेल्या घोटाळ्याचा तर हा बळी नव्हे ना?

## पोलीस प्रशासनाने या दृष्टीकोनातूनही तपास करण्याची गरज

**बीड । दिव्य रिपोर्टर**

शनिवारी एका जीएसटी अधिकाऱ्याचा मृतदेह त्यांच्याच कारमध्ये अज्ञातस्थळी संशयास्पद आढळून आल्यानं खळबळ उडाली होती. बीड जवळील कपिलधारवाडी परिसरात राज्य कर अधिकारी सचिन जाधवर यांचा मृतदेह गाडीत आढळून आला, त्यानंतर सदर ठिकाणी पोलिसांकडून फॉरेन्सिक टीमच्या माध्यमातून पंचनामा करण्यात आला. पीएम रिपोर्ट नंतर जाधवर यांच्या मृत्यूचे कारण समोर येईल, मात्र घटनास्थळावर सुसाईड नोट आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे वरिष्ठांच्या जाचाला कंटाळून या अधिकाऱ्याने जीवन संपवल्याची प्राथमिक माहिती आहे. तसेच मागील काही दिवसांपूर्वी बीड जिल्ह्यात बनावट कागदपत्राच्या आधारावर काही एजन्सी ट्रेडर्स रजिस्टर्ड करून त्या ट्रेडर्समधून जीएसटी भरलेली बनावट बिले देवून अनेक गुत्तेदारांची फसवणूक झाली ▶▶ पान २ वर...



**जिल्ह्यात बोगस एजन्सी, ट्रेडर्स रजिस्ट्रेशन करून जीएसटीचा कोट्यवधीचा घोटाळा झाल्याचा संशय**

**बीडमध्ये जीएसटी अधिकाऱ्याचा कारमध्ये आढळला मृतदेह, पोलिसांना सापडली चिठ्ठी, मृत्युचे कारण समोर**

### कोट्यवधीचा घोटाळा झाल्याचा संशय

बेरोजगार तरुणांचे आधारकार्ड, पॅनकार्ड बीडहून किंवा त्या बेरोजगार तरुणांना रोजगारीचे आमिष दाखवून काही जीएसटी माफियांनी बीड टॅक्स विभागात बनावट कागदपत्राच्या आधारावर या बेरोजगार तरुणांच्या नावाने ट्रेडर्स, एजन्सी रजिस्ट्रेशन करून त्या एजन्सी ट्रेडर्समधून कोट्यवधीची बनावट बिले दिली होती. या बनावट बिलातून मोठ्या प्रमाणात जीएसटी बुडाली असून कोट्यवधीचा घोटाळा झाल्याची चर्चा जिल्ह्यात आहे. तसेच काही दिवसांपूर्वी नागपूरचेही पथक बीडमध्ये आले होते. पोलीस प्रशासनाने या दृष्टीकोनातूनही या घटनेचा तपास करण्याची गरज असून सचिन जाधवर हे कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून त्यांची बीड कार्यालयात ओळख होती. त्यांना अधिकाऱ्यांचा दबाव कशाचा होता? हे चौकशीअंतीच समजू शकेल.

# ज्ञानराधा बँक घोटाळ्यातील आरोपींना घेऊन जाणाऱ्या पोलिस व्हॅनने घेतला तरुणाचा बळी

## मोटारसायकलवरील अमोल हांडगे याचा उपचारादरम्यान मृत्यू

**बीड । दिव्य रिपोर्टर**



नेकनूर-येळंब रोडवर काल सायंकाळी झालेल्या भीषण अपघातात गंभीर जखमी झालेल्या दुचाकीस्वार अमोल हांडगे (वय ३५, रा. वाघेबाभळगाव, ता. केज) यांचा उपचारादरम्यान आज सकाळी मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून हांडगे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. ज्ञानराधा मल्टीस्टेट बँक घोटाळा प्रकरणात अटकेत असलेले मुख्य आरोपी सुरेश कुटे आणि त्यांची पत्नी अर्चना कुटे यांना केज येथून बीडकडे घेऊन जाणाऱ्या पोलिसांच्या व्हॅनने दुचाकीला समोरासमोर धडक देत निष्पाप तरुण शेतकऱ्याचा बळी घेतल्याने सर्वत्र संताप व्यक्त होत आहे.

पोलीस व्हॅनने काल सायंकाळी मोटरसायकलला जोराची धडक दिली होती.या अपघातात अमोल हांडगे व त्यांच्यासोबत असलेले विक्रम हांडगे (वय ३५) हे दोघेही गंभीर जखमी झाले होते. दोघेही शेती व्यवसाय करत असून नेकनूर येथे काम आटपून आपल्या गावी वाघेबाभूळगावकडे परत जात असताना ही दुर्घटना घडली होती.अपघातात अमोल हांडगे यांना गंभीर स्वरूपाच्या जखमा झाल्या होत्या. त्यांचा पाय तुटल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले होते. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र डॉक्टरांच्या प्रयत्नांनंतरही आज सकाळी उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. दरम्यान, या अपघातात जखमी झालेले विक्रम हांडगे यांच्यावर उपचार सुरूअसून त्यांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. तसेच पोलिसांच्या ताब्यात असलेल्या आरोपी अर्चना कुटे यांनाही किरकोळ दुखापत झाली असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. आरोपी सुरेश कुटे यांना कोणतीही गंभीर दुखापत झाल्याची माहिती नाही. या भीषण अपघातात एका निष्पाप शेतकऱ्याचा बळी गेल्याने नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त केला जात असून या घटनेने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे.

# शिक्षकांकडून दोन पगारी घेवून जि.प.निवडणूक लढविण्याचा निर्णय त्या शिक्षणसंस्थेच्या सचिवाच्या अंगलट येणार

**निवडणूक निधी वसूलीच्या आदेशाचे पत्र विरोधक निवडणूकीच्या काळात व्हायरल करणार, जर मतदारांनी शिक्षकांच्या वेदना समजून घेतल्या तर त्या संस्था सचिवाची जामीन जप्त होण्याची शंका**

**बीड । दिव्य रिपोर्टर**

एका शिक्षणसंस्थेच्या सचिवाने जिल्हा परिषद निवडणूक लढविण्यासाठी आपल्या संस्थेतील सर्व शिक्षकांनी आपल्या दोन पगारी जमा करून निवडणूककामी मदत करावी असे आदेश काढून त्या आदेशाची प्रत सर्व शिक्षकांकडे फिरविली. शिक्षकांकडून दोन पगारी घेवून जिल्हा परिषद निवडणूक लढविण्याचा निर्णय त्या शिक्षणसंस्थेच्या सचिवाच्या अंगलट येणार असल्याची जोरदार चर्चा असून निवडणूक निधी वसूलीच्या आदेशाचे पत्र विरोधक निवडणूकीच्या काळात व्हायरल करणार असल्याची शंका व्यक्त केली जात आहे.

ज्या परिसरातून संबंधित शिक्षणसंस्थेचा सचिव निवडणूक लढविणार आहे त्या परिसरातील मतदारांनी शिक्षकांच्या वेदना समजून घेतल्या तर त्या शिक्षणसंस्थेच्या सचिवाची जामीन जप्त होणार असल्याची शंका असून शिक्षकांच्या दोन पगारी घेवून त्या पगारीवर जि.प.निवडणूक लढविणे कितपत योग्य आहे. विशेष म्हणजे संबंधित शिक्षणसंस्थेच्या सचिवाने चक्क आदेश काढून आपल्या संस्थेतील शिक्षकांनी जि.प.निवडणूक लढविण्यासाठी निवडणूक निधी म्हणून दोन पगारी जमा कराव्यात असे आदेश दिले आहेत. त्या आदेशाची प्रत सर्व शिक्षकांसमोर फिरविण्यात आली असून त्या आदेशाच्या प्रतवर ज्या शिक्षकांनी ते आदेश वाचलेत त्यांनी त्याच्यावर स्वाक्षऱ्याही केल्या आहेत. एकंदरीत हे प्रकरण अत्यंत गंभीर असून जर शिक्षणविभागाने या गंभीर प्रकरणाकडे विशेष लक्ष दिले तर सदरील प्रकरण त्या शिक्षणसंस्थेच्या अंगलट येण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

### एखाद्या शिक्षकाने तक्रार करण्याची गरज दुसऱ्याही शिक्षणसंस्था संशयाच्या विळख्यात

ज्या शिक्षणसंस्थेने लेखी आदेश काढून शिक्षकाने आपल्या दोन पगारी निवडणूक निधी म्हणून जमा कराव्यात असे आदेश काढले, त्या आदेशात दुसऱ्या शिक्षणसंस्थेवरही त्यांनी आरोप लावले आहेत. आदेशात नमूद मजकुरातून दुसऱ्या शिक्षणसंस्था संशयाच्या विळख्यात आल्या असून जर शिक्षणसंस्थेचा सचिव निवडणूक लढविण्यासाठी शिक्षकांच्या दोन पगारी घेत असतील तर ही गंभीर बाब आहे. यासाठी एखाद्या शिक्षकाने तक्रार करण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज असून जरी यात शिक्षक पुढे नाही आले तरी निवडणूकीच्या काळात विरोधक या प्रकरणाला वाचा फोडतीलच यात काही शंका नाही.

# महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजनेचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांची यादी जोपर्यंत प्रकाशित होणार नाही तोपर्यंत बोगसगिरी थांबणे अशक्य

## योजनेतील हॉस्पिटल मालकांनी लाभार्थीची यादी मोबाईल नंबरसहीत हॉस्पिटलमध्ये लावणे गरजेचे

**बीड । दिव्य रिपोर्टर**

एखाद्या व्यक्तीला गंभीर आजार झाला तर त्या व्यक्तीचे नाव प्रकाशित करणे चुकीचे आहे. परंतु महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजनेत सर्वसामान्य रुग्णांचे नाव गुप्त ठेवणे ही बाब योग्य नसून जोपर्यंत लाभार्थ्यांची यादी प्रकाशित होणार नाही तोपर्यंत या योजनेतून होणाऱ्या बोगसगिरीला वाचा फोडणे शक्य होणार नाही. विशेष म्हणजे माहितीच्या अधिकारातही लाभार्थीची यादी मिळत नसल्याने याचाच काही हॉस्पिटल मालक फायदा घेत असल्याची शंका व्यक्त केली जात ▶▶ पान २ वर...

**माहितीच्या अधिकारातही लाभार्थ्यांची यादी मिळत नसल्याचा काही हॉस्पिटल मालक फायदा घेत असल्याची शंका**



जनआरोग्य योजनेत कोट्यवधीचा स्टेंट घोटाळा

योजनेतून रुग्णाला जो खर्च मिळतो त्यात स्टेंट टाकणे व रुग्णाला एक-दोन दिवस रुग्णालयात ठेवून उपचार करणे अशी आहे तरतूद

जर हॉस्पिटल ए ग्रेड असेल तर योजनेतून ॲन्जियोप्लास्टीसाठी ८० हजार रुपयांची तरतूद तर बी ग्रेड हॉस्पिटलसाठी ७७ हजार रुपयांची तरतूद

दिव्य आधार

दर्जेदार स्टेंट टाकण्यासाठी ४० हजार रुपये एक्स्ट्रा तर ॲन्जियोग्राफीच्या नावावर दहा हजार रुपये असे प्रति रुग्ण ५० हजार रुपयांची वसूली

ग्राऊंड रिपोर्टर दिव्य आधार शेख रिजवान 9561840184

तर मग योजनेतून मिळणारी स्टेंटची रक्कम जाते कुठे?

### गंभीर आजाराच्या रुग्णांची नावे गुप्त ठेवा

एखाद्या रुग्णाला गंभीर आजार असेल आणि त्या रुग्णाला योजनेतून लाभ देण्यात आला असेल तर अशा गंभीर आजाराच्या रुग्णाची नावे गुप्त ठेवणे योग्य आहे परंतु सर्वसामान्य आजाराच्या रुग्णांचीही नावे गुप्त ठेवणे हे योग्य नाही. विशेष म्हणजे ज्या हॉस्पिटलमध्ये योजना राबविल्या जातात त्या हॉस्पिटल मालकांनी ज्या लाभार्थ्यांना लाभ दिला अशांची नावे रुग्णालयात मोबाईल नंबरसह फलकावर लावावी. जेणेकरून कामात पारदर्शकता होईल व रुग्णांना योग्य उपचार मिळाला का? योजनेच्या हॉस्पिटलमध्ये आर्थिक पिळवणूक झाली का? याची विचारणा करणे सोयीस्कर होईल. यासाठी रुग्णांची नावे प्रकाशित करणे गरजेचे वाटते.




# ना. पंकजाताई मुंडे यांच्या झंझावाती नेतृत्वाचा करिश्मा

## सभा घेतलेल्या ठिकाणी भाजपा अव्वल; जनतेने विकासाला कौल दिला – ना.मुंडे

**मुंबई । दिव्य रिपोर्टर**

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा स्टार प्रचारक ना. पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाचा करिश्मा महापालिका निवडणुकीतही दिसून आला. ज्या ज्या ठिकाणी त्यांनी सभा घेतल्या होत्या त्याठिकाणी भाजप अव्वल ठरला आहे.



राज्यातील महापालिका निवडणुकीचा निकाल आज जाहीर झाल्यानंतर भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला असून सर्वत्र जल्लोष साजरा होत आहे. प्रदेश कार्यालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, ना. पंकजाताई मुंडे व अन्य नेत्याच्या उपस्थितीत आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

सभा घेतलेल्या ठिकाण विजय

ना. पंकजाताई मुंडे हया नांदेडच्या प्रभारी होत्या, याठिकाणी त्यांनी वेगवेगळ्या प्रभागात सभा घेतल्या होत्या, तिथे भाजपने बहुमतासह घवघवीत यश संपादन केले. याशिवाय त्यांनी जिथे जिथे सभा घेतल्या त्या पुणे, पिंपरी चिंचवड, अहिल्यानगर, इचलकरंजी, पनवेल, कल्याण, नाशिक आदी ठिकाणी भाजपने ऐतिहासिक यश संपादन करत महा पालिकेवर झेंडा फडकविला. या यशाबद्दल ना. पंकजाताईंचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

जनतेने विकासाला कौल दिला

या निवडणुकीत भाजपने जोरदार यश मिळवले आहे, मला खूप आनंद होत आहे. आम्हाला ऐतिहासिक विजय मिळेल हा विश्वास होताच. जनतेने विकासाला कौल दिला आहे,विजयाचं श्रेय देवाभाऊंना दिलं पाहिजे अशा शब्दांत ना. पंकजाताईंनी निवडणूक निकालानंतर प्रतिक्रिया दिली.



मुंबई:राज्यातील महानापालिका निवडणुकांमध्ये महायुतीला मिळालेल्या यशाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मुंबई येथील वर्षा निवासस्थानी सत्कार करताना रिपाइं अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री रामदास आठवले, युवा रिपाइं प्रदेश अध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे, माजी मंत्री अविनाश महातेकर, गौतम सोनवणे, एम. एस. नंदा आदी.

## पान १ वरून

### डेमो हाऊस घोटाळा :

विभाग क्रमांक १ मधून डेमोहाऊसवर चक्क दहा लाख रुपये खर्च करण्याचे नियोजन करण्यात आले असून दहा लाखांत अंदाजे १ वनबीएचके घर तयार होवू शकते परंतु जिल्हा परिषद बांधकाम विभाग २६९ स्क्वेअर फुट जागेत बांधकामासाठी दहा लाख रुपये खर्च करत असेल तर याची उच्चस्तरीय चौकशी करणे गरजेचे आहे.

सन २०२३ यावर्षी जिल्हा परिषद परिसरात डेमो हाऊस तयार करण्यासाठी पाच लाख रुपयांच्या निधीची तरतूद जिल्हा परिषद बांधकाम विभागाने केली होती. त्या अनुषंगाने नियमाने एका एजन्सीला डेमो हाऊस तयार करण्याचे काम देण्यात आले. संबंधित एजन्सीने अंदाजे २६९ स्क्वेअर फुट जागेत डेमो हाऊस तयार करण्याची तरतूद केली. यात संबंधित एजन्सीने एक खोली, एक किचन, बाथरूम अशाप्रकारे तरतूद केली व छतावर पत्रे टाकले. पाच लाखात एवढे काम करण्यात आले. त्यानंतर ते डेमो हाऊस अर्धे तयार होवून पडून होते. त्यानंतर आताचे कार्यकारी अभियंता यांनी पुन्हा त्या डेमो हाऊसचे उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी पुन्हा पाच लाख रुपयांच्या निधीची तरतूद केली. एकंदरीत २६९ स्क्वेअर फुट जागेत पत्र्याची एक खोली, एक किचन व बाथरूम बांधण्यासाठी दहा लाख रुपयांचा खर्च करणे हे कितपत योग्य आहे. एकंदरीत या डेमो हाऊसमध्ये मोठा घोटाळा झाल्याचे दिसून येत असून जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे हे भयान वास्तव आहे. संबंधित डेमो हाऊसवर दहा लाख रुपये खर्च कसा झाला? याचा आढावा घेणे गरजेचे असून कार्यकारी अभियंता व शाखा अभियंता यांची उच्चस्तरीय चौकशी करणे गरजेचे वाटते.

### जीएसटी माफीयांनी केलेल्या

होती. गुत्तेदारच नव्हे तर जीएसटी बुडवून प्रशासनालाही मोठा फटका बसला होता. तसेच काही दिवसांपूर्वी नागपूरचे पथकही बीडमध्ये आले होते आणि दोघांना ताब्यात घेवून गेले होते. जीएसटी माफियांनी केलेल्या घोटाळ्याचा तर हा बळी नव्हे ना? अशी जिल्हाभरात चर्चा असून पोलीस प्रशासनाने या दृष्टीकोनातूनही विचार करण्याची गरज आहे.

जीएसटी अधिकाऱ्याच्या मृतदेहाजवळ पोलिसांना सुसाईड नोट आढळून आली, आता याच सुसाईड नोट आधारे संबंधिताची चौकशी केली जाणार आहे. तत्पूर्वी, सदरील प्रकरणात पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. आता, उपलब्ध झालेल्या पुराव्यानुसार पुढील कारवाई बीड पोलिसांनी सुरू केली आहे, अशी माहिती बीडचे अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी दिली.

सचिन जाधवर मूळचे सोलापूर जिल्ह्यातील चुंब या गावचे रहिवाशी आहेत. मागील काही वर्षांत ते बीडच्या जीएसटी कार्यालयात सेल्स टॅक्स ऑफिसर म्हणून कार्यरत होते. शुक्रवारी राहत्या घरातून बाहेर पडलेले सचिन जाधवर शनिवार पर्यंत घरी पोहोचले नव्हते. त्यामुळे त्यांच्या पत्नी मयुरी जाधवर यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात मिसिंगची तक्रार दाखल केली. पोलिसांनी मोबाईल लोकेशनद्वारे जाधवर यांचा शोध घेतला असता बीड जवळील कपिलधारवाडी परिसरात त्यांचा मृतदेहच गाडीत संशयास्पदरित्या आढळून आला. घातपाताचा संशय आल्याने पोलिसांनी फॉरेन्सिक टीमच्या माध्यमातून या संपूर्ण प्रकाराचा तपास सुरू केला. शवविच्छेदना, दरम्यान जाधवर यांच्या मृतदेहाजवळ सुसाईड नोट आढळली आणि यात आत्महत्येचं कारण वरिष्ठाच्या त्रासाचे नमूद करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने पोलिसांनी एका अधिकाऱ्याला चौकशीसाठी ताब्यात घेतले. उपलब्ध झालेल्या पुराव्यानुसार पुढील कारवाई सुरू असल्याचं बीड पोलिसांनी सांगितले.

### घटनेच्या सखोल चौकशी मागणी

सचिन जाधवर २०१२ च्या एमपीएससी परीक्षेत राज्यात पहिले आले होते. सर्वांशी मनमिळावू असलेले जाधवर यांच्या मृत्यूचे गूढ संशयास्पद आहे. बंद कारमध्ये मडक्यात कोळसा आणि लाकूड जाळून धूर केल्याचं प्रथम दर्शनी निदर्शनास आलं. त्यामुळे या सर्व घटनेची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी नातेवाईकांनी केली आहे. आढळून आलेल्या सुसाईड नोट वरून सचिन जाधवर यांच्या मृत्यूचे कारण समोर येत आहे. मात्र, वरिष्ठ अधिकाऱ्याच्या केलेल्या चौकशीत नेमकं काय समोर आलं. जाधवर यांच्या मृत्यू मागील ठोस कारण काय? असे अनेक प्रश्न बीड पोलिसांना सोडवायचे आहेत.

### महात्मा ज्योतीबा फुले

असून ज्या हॉस्पिटलमध्ये या योजना राबविण्यात येत आहेत त्या हॉस्पिटलमध्ये योजनेचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांची यादी मोबाईल नंबरसहीत प्रकाशित करणे गरजेचे वाटते. तरच यातून होणाऱ्या बोगसगिरीला लगाम बसेल यात काही शंका नाही.

शहरातील काही हॉस्पिटलमध्ये ॲन्जियोप्लास्टी आजारावर शस्त्रक्रिया केली जाते. परंतु रुग्ण ॲन्जियोप्लास्टी गेल्यानंतर सर्वप्रथम त्या रुग्णाची ॲन्जियोग्राफी करतात, त्यात गरज असेल तर ॲन्जियोप्लास्टी केली जाते. परंतु ॲन्जियोप्लास्टी करण्यापूर्वी त्या रुग्णालया दर्जेदार स्टेंट टाकण्यासाठी अतिरिक्त चार्ज घेतला जातो. नियमाने रुग्णाला योजनेतून ॲन्जियोप्लास्टीसाठी ६० हजार रुपये मिळतात. यात रुग्णाला स्टेंट टाकणे व दोन दिवस उपचार देणे अशी तरतूद आहे. परंतु काही हॉस्पिटल दर्जेदार स्टेंटच्या नावावर ४० हजार रुपये रुग्णांकडून एक्स्ट्रा घेतात. तर मग योजनेतून मिळणाऱ्या स्टेंटची रक्कम जाते कुठे? हा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होत असल्याने आतापर्यंत हर्टकेअर सेंटरमधून किती रुग्णांवर ॲन्जियोप्लास्टी शस्त्रक्रिया झाल्या याची माहिती मागितली असता सदरील रुग्णांची नावे व मोबाईल नंबर प्रकाशित करता येत नाही अशी माहिती वरिष्ठांनी दिली असून महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजनेत लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांची यादी जोपर्यंत प्रकाशित होणार नाही तोपर्यंत याप्रकरणाला वाचा फुटणार नाही यासाठी पारदर्शक कार्य होणे गरजेचे वाटते.

# अजितदादाच्या माध्यमातून संस्थांचा विकासाची जबाबदारी घेतो – आ.पंडित

**बीड । दिव्य रिपोर्टर**



बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र कोळवाडी येथे श्री.प.पु १००८ गुरुवर्य गंगाभारती महाराज यांच्या ३३ व्या पुण्यतिथी उत्सवाची मोठ्या थाटात सांगता झाली. यावेळी संपूर्ण महाराष्ट्रातून हजारो भाविक भक्त उपस्थिती. श्री ह भ प पुंडलिक महाराज जाधव यांच्या काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसाद वाटप करण्यात आला. यावेळी श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, महंत हरिहर महाराज भारती संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील पाटील, आमदार विजयसिंह पंडित, रमेश भाऊ पोकळे, स्वप्निल भैया गलधर, श्री ह भ प नाना महाराज कदम, श्री ह भ प सुरेश महाराज जाधव, रंजीत महाराज शिंदे, बळीराम आप्पा गवते, भारत बाप्पा काळे, हनुमान मुळीक, तुळशीदास महाराज शिंदे यांच्यासह हजारो भाविक भक्तांची उपस्थिती होती.

श्रीक्षेत्र कोळवाडी येथे श्री प.पु १००८ गंगाभारती महाराज यांच्या ३३ व्या पुण्यतिथी उत्सवाचे आज काल्याचे किर्तन आणि सांगता झाली. यावेळी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार श्री ह भ प पुंडलिक महाराज जाधव यांनी संत तुकाराम महाराज यांच्या

आता हेंचि जेऊं ।सवें घेऊं शिदोरी ।।१।।

हरीनामाचा खिचडी काला । प्रेमे मोहीला साधनें ।।धृ ।।

चर्वी चर्वी घेऊं घास ।ब्रम्हरस आवडी ।।३।।

तुका म्हणे गोड लागे ।तों तों मागे रसना ।।४।।

या अभंगावर सुंदर चिंतन मांडले.. पुढे बोलताना संतांच्या दर्शनाने अंतकरणाच्या प्रसन्नतेचा प्रसाद मिळतो. संसाराचा समारोप हा पश्चातापाने होतो. संसाराचा स्वभाव दुःखाचा आहे.परमार्थाचा समारोप हा प्रसादाने होतो.

# माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांना अंबाजोगाई जिल्हा सत्र न्यायालयाकडून दिलासा

## मुंजा गित्ते जमीन खरेदी खटला पुनरुज्जीवित करण्यास स्थगिती

**अंबाजोगाई । दिव्य रिपोर्टर**

जगमित्र शुगर्स या प्रस्तावित कारखान्यासाठी जमीन खरेदी प्रकरणात माजी मंत्री आ धनंजय मुंडे यांच्या सह तिघांविरुद्ध फसवणूक केल्याच्या खटल्यात अंबाजोगाई न्यायालयाने धनंजय मुंडे व अन्य तिघांना दोषमुक्त केले होते. त्यावर अंबाजोगाई अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयात हा खटला पुन्हा सुरू करण्याचा अर्ज केल्यानंतर न्यायालयाने तो खटला पुनरुज्जीवित करण्याच्या दिलेल्या निर्णयावर धनंजय मुंडे यांनी केलेल्या अर्जावर सुनावणी घेतल्यानंतर स्थगिती दिली आहे.



न्यायालयात धनंजय मुंडे यांच्या वतीने त्यांचे वकील ॲड. अशोक कवडे यांनी स्थगिती अर्ज दाखल केला होता. धनंजय मुंडे यांच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात अपील दाखल करे पर्यंत किंवा अपिलाची मुदत पूर्ण होई पर्यंत हा खटला चालविण्यास अंबाजोगाई अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने ही स्थगिती दिली आहे. २०११-१२ साली खरेदी केलेल्या या जमिनीच्या प्रकरणात धनंजय मुंडे यांच्या विरोधात बर्दापूर पोलिस ठाण्यात तक्रार देण्यात आली होतीश. तत्कालीन परिस्थितीत पोलिसांनी तपास करून तक्रारीत तथ्य न आढळल्याने गुन्हा दाखल केला नाही, त्यानंतर उच्च न्यायालयात हस्तक्षेप याचिका दाखल करून दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. या खटल्यात दोन्ही पक्षांचे म्हणणे, साक्ष, पुरावे इत्यादी वस्तुस्थिती पाहून अंबाजोगाई न्यायालयाने धनंजय मुंडे व अन्य तिघांना दोषमुक्त केले होते. मात्र त्याविरुद्ध जिल्हा सत्र न्यायालयात आव्हान देण्यात आले. त्यावर धनंजय मुंडे यांच्या वकिलांनी केलेल्या अर्जावर दोन्ही बाजूंचे म्हणणे न्यायालयाने ऐकल्यानंतर स्थगिती देण्यात आली असून, श्री मुंडे यांना अपील करण्यासाठी पुरेसा वेळ देण्यात आला आहे. न्यायालयाचा स्थगिती निकाल स्वयंस्पष्ट असून तो न्यायालयाच्या पोर्टलवर देखील उपलब्ध आहे. मात्र याबाबत अर्धवट माहितीच्या आधारे कुणीतरी खोडसाळपणाने चुकीचे वृत्त प्रसिद्ध केले असून, संबंधितास कायदेशीर नोटीस पाठवणार असल्याचे मुंडे यांचे वकील ॲड. अशोक कवडे यांनी सांगितले आहे.

# अतीका मीर आणि काश्मिरी मुलीच्या स्वप्नाचा शांत वेग

काही कथा अशा असतात ज्या अचानक जनमानसात घुमू लागतात, तर काही शांतपणे स्वतःचा प्रवास करत राहतात – इतपत की शेवटी त्यांची सत्यता नाकारणे अशक्य होते. अतीका मीरचा एफ-वन सर्किटपर्यंतचा प्रवास हा दुसऱ्या प्रकारातला आहे – शांत, शिस्तबद्ध आणि कुठलाही गाजावाजा न करता उभा राहिलेला. आज मागे वळून पाहिले तर तो अपरिहार्य वाटतो, पण प्रत्यक्षात तो अतिशय कठीण होता.

काश्मीरमधील एका मुलीने मोटरस्पोर्टसारख्या अत्यंत स्पर्धात्मक आणि पुरुषप्रधान क्षेत्रात पाऊल ठेवणे ही केवळ वैयक्तिक निवड नाही; ती काय शक्य आहे याची नवी व्याख्या आहे. अतीकाला रेसिंगची कोणतीही कौटुंबिक परंपरा लाभलेली नव्हती, ना ती महागड्या इंजिनांमध्ये वाढली. तिची सुरुवात – अनेक महान कथांप्रमाणे – कुतूहल आणि एका सूक्ष्म बंडखोरीतून झाली. वेगाच्या आवाजाकडे ओढली गेलेली एक मुलगी, जिला तिचं स्वप्न तिच्यासारख्या मुलीसाठी किती विचित्र आहे याची पर्वा नव्हती.

तिचे घडणं एखाद्या आलिशान अकादमीत झालं नाही, तर दीर्घ सराव, अनिश्चित प्रवास आणि प्रत्येक क्षणी स्वतःला सिद्ध करण्याच्या दबावातून घडलं. मोटरस्पोर्ट अचूकता, सहनशक्ती आणि निर्भयता मागतो – आणि या गुणांची जडणघडण अतीकात प्रसिद्धी येण्याआधीच झाली होती.

तिच्या यशाला वेगळं ठरवतं ते केवळ तिचं कौशल्य नाही, तर तिची पार्श्वभूमी आहे. ती अशा प्रदेशातून येते जो बहुतेक वेळा फक्त राजकारणाच्या चष्म्यातून पाहिला जातो; अशा समुदायातून, ज्याबद्दल खूप बोललं जातं पण फारसं ऐकलं जात नाही; आणि अशा लिंगातून, ज्याला लहानपणापासूनच मर्यादा दाखवल्या जातात.

पण रेस ट्रॅकवर हे सगळं मागे पडतं. हेल्मेटच्या आत सगळ्या ओळखी विरून जातात – उरतो फक्त प्रतिसाद, वेळेचं भान आणि शिस्त.

ती शांत ताकदीने स्पर्धा करते. ना आक्रोश, ना गर्जना – फक्त अशी क्षमता जी स्वतःच बोलते. आणि ही क्षमता आता जग ऐकू लागलं आहे. आंतरराष्ट्रीय कार्टिंग सर्किटवर तिची उपस्थिती ही फक्त क्रीडा-यश नाही, तर राष्ट्रीय कल्पनाविश्वातला बदल आहे. ती छोट्या शहरांतील, विशेषतः मुस्लिम मुलींना सांगते की मोठी स्वप्नं पाहणं कुणाचं खासाधिकार नाही.

तरी अतीकाला केवळ एक प्रतीक बनवणं अन्यायकारक ठरेल. ती आधी एक खेळाडू आहे – वळणांचा अभ्यास करणारी, प्रत्येक फेरीचं विश्लेषण करणारी आणि प्रत्येक पराभवाला अपयश न मानता शिकण्याची संधी मानणारी. तिची जिद्द आणि नम्रता हेच तिचं सर्वात मोठं शस्त्र आहे. ती अपवाद बनू इच्छित नाही, तर अशा भविष्याचा भाग व्हायचं स्वप्न पाहते जिथे मोटरस्पोर्टमध्ये मुली असणं काही विशेष वाटणार नाही – कारण त्या कमी नाहीत, तर आता कमी राहिलेल्या नाहीत.

आपण तिचा सन्मान करताना एक साधी गोष्ट लक्षात ठेवावी लागते: बदल नेहमी घोषणा किंवा क्रांतीतून येत नाही. कधी कधी तो अशा क्षणी येतो – जेव्हा एक काश्मिरी मुलगी आपला हेल्मेट घट्ट बांधते, श्वास स्थिर करते आणि शांत पण आत्मविश्वासाने ठरवते की ती आता शर्यतीसाठी तयार आहे.

**– इन्शा वारसी**
**(फ्रँकोफोन आणि पत्रकारिता अध्ययन, जामिया मिलिया इस्लामिया)**

# अनादरीत धनादेशा प्रकर्णी आरोपीस सात लाख रुपये दंड व सहा महिने शिक्षा-ॲड. शशिकांत सावंत

**बीड । दिव्य रिपोर्टर**

येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब ९ वे यांनी महत्त्वपूर्ण निकाल देऊन आरोपीस तब्बल सात लाख रुपयाचा दंड करून सहा महिन्याची शिक्षा सुनावलेली आहे, घटनेची हकीकत अशी की, आरोपी अशोक निवृत्ती जाधव,यांनी फिर्यादी अरुण दादाराव सोनवणे,यांच्याकडून रक्कम रुपये सहा लाख रुपये हात उसने म्हणून घेतले होते सदरची रक्कम परत करतेवेळी आरोपी यांनी फिर्यादी यांच्या हक्कांमध्ये रक्कम रुपये सहा लाख रुपयाचा धनादेश दिला होता सदरचा धनादेश बँकेत वाटेल व फिर्यादीस त्याची आरोपीकडे असणारी रक्कम त्यास मिळून जाईल असा शब्द व भरवसा दिला होता, परंतु सदरचा धनादेश बँकेत अनादरीत झाला व खात्यावर पुरेशी रक्कम शिल्लक नाही या कारणाने परत आला त्यामुळे फिर्यादी,यांनी आरोपी यांच्या विरोधामध्ये बीड येथील अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब बीड यांचे न्यायालयात समरी क्रिमिनल केस क्रमांक. ६३८/२३ अरुण विरुद्ध अशोक असे प्रकरण दाखल केले सदर प्रकरणांमध्ये मा. न्यायालयाने गुणदोषावर प्रकरण चालून आरोपीच्या वतीने सावकारकीचा बचाव घेण्यात आला व त्याने फिर्यादी कडून व्याजाने पैसे घेतले होते व त्याने दिलेला सुरक्षा पोटीचा धनादेशाचा गैरवापर केल्याचा बचाव घेण्यात आला परंतु मा. न्यायालयाने आरोपीचा बचाव फेटाळून लावला व प्रकरणांमध्ये आरोपीने कलम १३८ निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट क्ट प्रमाणे गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे महत्त्वपूर्ण निकाल देऊन आरोपी अशोक निवृत्ती जाधव , यांना सात लाख रुपये दंड व सहा महिन्याची शिक्षा सुनावलेली आहे सदर प्रकरणात फिर्यादीच्या वतीने ॲड. शशिकांत सावंत यांनी भक्कम बाजू मांडली, त्यांना ॲड. विशाल विलासराव कदम,ॲड. अभिषेक बहिर,ॲड. माऊली डाके ॲड. राजकुमार धरणे,ॲड. मुकुंद लोणकर ॲड. प्रदीप दराडे ॲड. विजय डोके,ॲड. अमोल तिडके,ॲड. प्रतीक गव्हाणे यांनी सहकार्य केले.



# डॉ.अमोल गिते यांची राज्यकार्यकारणीवर नियुक्ती

**बीड । दिव्य रिपोर्टर**




दी. १६/०१/२०२६ रोजी आय एम एस सचिव बीड डॉक्टर अमोल गिते यांची राज्याच्या सांस्कृतिक मंडळाच्या राज्यकार्यकारणी सदस्य जेष्ठ मार्गदर्शन महानून नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती राज्य अध्यक्ष डॉ संतोष कुलकर्णी व सचिव डॉ विक्रांत देसाई यांनी पत्राद्वारे कळवली असून या बद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो असे डॉ अमोल गिते म्हणाले,व येणारा काळात राज्य स्तरावर देखील ऊल्लेख नीय कार्य करण्यात येईल असे त्यांनी सांगितले. तसेच या निवड़ीबद्दल डॉ गिते यांचे सर्वस्तरातुन अभिनंदन होत आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र राज्य

# राष्ट्रीय रेबीज नियंत्रण कार्यक्रम


रेबीज हा एक जीव घेणा आजार आहे आपण हा आजार सहज टाळू शकतो



- कुत्रा किंवा इतर प्राणी चावल्यामुळे झालेली जखम साबण आणि नळाच्या वाहत्या पाण्याने स्वच्छ धुवा.
- जखमेला निर्जतुक मलम लावा.



- जखमेला मिरची, तेल, चुना असे कोणतेही घातक पदार्थ लावू नका.
- ताबडतोब शासकीय दवाखान्यात जा आणि डॉक्टरांच्या सल्ल्याने रेबीज विरोधी लस घ्या.



- लसीच्या वेळापत्रकाचे तंतोतंत पालन करा.
- आपल्या घरातील पाळीव प्राण्यांचे वेळोवेळी रेबीज विरोधी लसीकरण करा.

जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, जिल्हा परिषद, बीड

# रस्ते सुरक्षा ही सामूहिक जबाबदारी -विवेक जॉन्सन





## रस्ते सुरक्षा अभियान २०२६ चे उद्घाटन

**बीड । दिव्य रिपोर्टर**

रस्ते सुरक्षा ही केवळ शासनाची नव्हे तर ती समाजाची सामुहिक जबाबदारी आहे असे प्रतिपादन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज येथे केले. हेल्मेटचा वापर, सिटबेल्टचा वापर करणे सुरू करावे तसेच मद्यपान करून वाहन चालवू नये असे ते म्हणाले.

सन २०२६ च्या रस्ता सुरक्षा अभियानाचे उद्घाटन आज त्यांच्या हस्ते झाले त्यावेळी ते बोलत होते. परिवहन विभाग, वाहतूक पोलीस, सार्वजनिक आरोग्य तसेच शालेय शिक्षण विभाग आणि विविध संघटनांच्या सहाय्याने या अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे.

सौ. केशरकाकु सोनाजीराव क्षीरसागर महाविद्यालय, बीड येथे रस्ता सुरक्षा अभियानाचे उदघाटन उत्साहात पार पडले. या अभियानाचा मुख्य उद्देश रस्ते अपघात कमी करणे, नागरिकांमध्ये वाहतुक नियमांबाबत जनजागृती निर्माण करणे तसेच सुरक्षित वाहतुकीची संस्कृती विकसित करणे हा आहे.

उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन विवेक जॉन्सन, जिल्हाधिकारी, बीड उपस्थित होते. जिल्हाधिकारी यांच्या हस्ते या अभियानाचे उद्घाटन झाले. कार्यक्रमात बोलताना त्यांनी रस्ता सुरक्षा ही केवळ शासनाची जबाबदारी नसुन प्रत्येक नागरिकाची सामुहिक जबाबदारी असल्याचे नमुद केले. केरळमधील दुचाकीवरून प्रवास करणारे वाहन चालक आणि पाठीमागे बसलेला सहप्रवाशी असे दोघेही हेल्मेट घालतात. तशी शिस्त आपल्या येथे असली पाहीजे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. रस्ते अपघातात होणारे मृत्यु कमी करण्यासाठी एज्युकेशन, इंजिनिअरिंग आणि इनफोर्समेंट या त्रिसुत्रीचा वापर करण्याचे त्यांनी सांगितले. शासकीय कार्यालयापासून वाहतूक नियमांच्या पालनाची सुरुवात करुन आपण सर्व नागरिकांसमोर आदर्श निर्माण करुया असे आवाहन त्यांनी सर्व शासकीय कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचारी यांना केले. जिल्हाधिकारी यांनी आपल्या भाषणात रस्ता सुरक्षेविषयी विविध बाबींचा परामर्श घेतला. नवनीत काँवत, जिल्हा पोलीस अधिक्षक, बीड यांनी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड यांच्या ताफ्यात नव्याने दाखल झालेल्या रडार वाहनाचे फित कापुन उदघाटन केले. या रडार वाहनांमुळे हेल्मेट, सीटबेल्ट, वेगमर्यादा आणि वाहतुकीच्या विविध गुन्ह्याविषयी गुन्हे दाखल करता येणार आहेत.कार्यक्रमाचे प्रास्ताविक उप प्रादेशिक परिवहन अधिकारी बालाजी भाऊसाहेब धनवे यांनी केले. यावेळी बोलताना त्यांनी बीड जिल्ह्यातील वाहनांची आणि अपघाताची आकडेवारी सांगून अपघातामध्ये १०% तर अपघाती मृत्युमध्ये ७% घट झालेले नमुद केले, या रस्ता सुरक्षा अभियानाअंतर्गत पुढील कालावधीत जनजागृती रॅली, शाळा व महाविद्यालयांमध्ये मार्गदर्शन सत्रे, वाहन चालकांसाठी समुपदेशन, नियमभंग करणा-यांवर प्रभावी कारवाई तसेच अपघातग्रस्तांसाठी तात्काळ मदत ( ) बाबत जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत.महाविद्यालयाचे प्राचार्य शिवानंद क्षीरसागर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. रस्ता सुरक्षा नियमावली या पुस्तिकेचे जिल्हाधिकारी यांचे हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी सर्व उपस्थितांना रस्ता सुरक्षेची शपथ देण्यात आली.कार्यक्रमास परिवहन विभागाचे अधिकारी, पोलीस प्रशासन, विविध शासकीय विभागांचे प्रतिनिधी, ड्रायव्हिंग स्कुल चालक, विद्यार्थी उपस्थित होते. हे अभियान यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.



बीड : नांदेड येथे लोकमत असोसिएशन लोकमत महा गेम्सच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित थाई बॉक्सिंग महाराष्ट्र राज्य असोसिएशन कप २०२६ अंतर्गत १९ वर्षांखालील मुलांच्या राज्यस्तरीय स्पर्धेत बीड जिल्ह्याच्या अबरार मुसाखान पठाण याने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला आणि सुवर्णयश मिळवले बद्दल नगर सेवक अँड महेश धांडे मा.नगरसेवक नरसिंग आण्णा नाईकवाडे व सर्व मित्र परिवाराच्या वतीने सत्कार करण्यात आला शुभेच्छा दिल्या.

# बाल लैंगिक अत्याचार प्रकरणी आरोपीस २० वर्षे सक्तमजुरी; न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय

**बीड । दिव्य रिपोर्टर**

गेवराई तालुक्यातील रामपुरी येथील सहा वर्षांच्या चिमुकलीवरील अमानुष लैंगिक अत्याचार प्रकरणात अखेर न्याय मिळाला असून, दोषी आरोपीस माननीय बीड जिल्हा व सत्र न्यायालयाने २० वर्षे सक्तमजुरीचा कारावास व २१ हजार रुपयांचा दंड अशी कठोर शिक्षा सुनावली आहे. या निर्णयामुळे संपूर्ण बीड जिल्ह्यात समाधानाची भावना व्यक्त होत असून, बाललैंगिक अत्याचाराविरोधात न्यायालयाने कडक संदेश दिला आहे.

या बाबत अधिक माहिती अशी की, दि. ४ मे २०२२ रोजी रामपुरी येथील सहा वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर अत्याचाराची अमानुष घटना घडली होती. या प्रकरणी तलवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा र. नं. ६८/२०२२ भा.दं.वि. कलम ४५२, ३७६, ३४ तसेच लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण अधिनियम (झजउडज) २०१२ अंतर्गत कलम ४, ८ व १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.




या गुन्ह्याचा सखोल तपास पिंक पथकाच्या महिला पोलीस उपनिरीक्षक अर्चना भोसले यांनी केला. तपासात सहाय्यक पोलीस फौजदार भगवान खाडे, पोलीस हवालदार महेश झिकरे व महिला पोलीस अंमलदार ज्योती साळुंखे यांनी मोलाचे सहकार्य केले. तपास पूर्ण झाल्यानंतर दोषारोपपत्र सत्र न्यायालयात दाखल करण्यात आले.

न्यायालयात सरकार पक्षाने सादर केलेले साक्षीदारांचे जबाब, वैद्यकीय अहवाल व अन्य ठोस पुरावे ग्राह्य धरत, न्यायालयाने मुख्य आरोपी सुंदर निवृत्ती तायड (वय ३८, रा. रामपुरी, ता. गेवराई) यास दोषी ठरवले.

या खटल्यात सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस अंमलदार अनुराधा गव्हाणे आणि अयोध्या खाडे यांनी कोर्ट पैरवी म्हणून प्रभावी भूमिका बजावली. फिर्यादीकडून भक्कम पुरावे मुद्देसूद मांडणी करत ड. भागवत राख सहाय्यक सहकारी अभियोक्ता व ड. तेजसजी सुभाष नेहरकर फिर्यादी चे वतीने यांनी कामकाज पाहिले. त्यांना सहाय्यक सरकारी अभियोक्ता ड. अजय राख, ड. अविनाश गंडले यांचे मार्गदर्शन लाभले. या निकालामुळे पीडित चिमुकलीला न्याय मिळाला असून, बाललैंगिक अत्याचार प्रकरणांत कोणतीही तडजोड होणार नाही, असा ठाम आणि कडक संदेश समाजात गेला आहे. या यशस्वी कामगिरीसाठी माननीय पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर व उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांचे मार्गदर्शन लाभले.

# गुत्तेदारांना फायदा देण्यासाठी कामाचे तुकडे; नागरिकांचा जीव धोक्यात

## बीड-पालवन-देवराई रस्त्याच्या काम तत्काळ सुरू करा-अजय सरवदे

**बीड । दिव्य रिपोर्टर**

बीड-पालवन-देवराई-पिंपळवाडी हा सलग व एकसंध रस्ता असताना, संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांनी गुत्तेदारांना अनुचित लाभ मिळावा या हेतूने रस्त्याचे काम जाणीवपूर्वक दोन भागांत विभागून दोन वेगवेगळ्या कंत्राटदारांना दिल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या निर्णयामुळे रस्त्याचे काम रखडले असून नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत.

देवराई ते पिंपळवाडी या रस्त्याचे डांबरीकरण पूर्ण झाले असले, तरी देवराईपालवनबीड या मुख्य मार्गाचे काम अद्यापही सुरू झालेले नाही. या मार्गावर मोठमोठे खड्डे पडले असून अपघातांची शक्यता वाढली आहे. दररोज शेकडो वाहनधारकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. धक्कादायक बाब म्हणजे या रस्त्याच्या कामास कार्यालयीन कार्यादेश मिळालेला असतानाही, राजकीय हस्तक्षेप आणि अंतर्गत डावपेचांमुळे प्रत्यक्ष काम सुरू करण्यात आलेले नाही. हा प्रकार थेट सार्वजनिक हिताला बाधा आणणारा आहे. सध्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका जाहीर झालेल्या असताना, काही गुत्तेदार ''मी रस्ता करून देतो'' अशा पद्धतीने मतदारांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करत असल्याचे चित्र दिसत आहे. निवडणूक प्रक्रियेचा गैरवापर करून विकासकामे राजकीय हत्यार म्हणून वापरणे हे लोकशाहीसाठी अत्यंत घातक असल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे. या संपूर्ण प्रकरणाची तात्काळ चौकशी करून बीडपालवनदेवराई रस्त्याचे काम गुणवत्तापूर्ण पद्धतीने त्वरित सुरू करावे, अशी जोरदार मागणी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांच्याकडून करण्यात आली आहे.

अन्यथा, दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. प्रशासन या गंभीर विषयाकडे डोळेझाक करणार की नागरिकांच्या जीविताचा प्रश्न गांभीर्याने घेणार, याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### जि.प.पं.स.निवडणुकीचे श्रेय घेण्यासाठी रस्ता काम सुरु करण्यास विलंब

**बीडपालवनदेवराई या रस्त्याच्या कामाला कार्यारंभ आदेश देण्यात आलेला असतानाही संबंधित गुत्तेदाराकडून जाणीवपूर्वक कामास विलंब केला जात आहे. याबाबत कार्यकारी अभियंता श्री. तोंडे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन तक्रार केल्यानंतर संबंधित कन्स्ट्रक्शनवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा शब्द त्यांनी दिला आहे.दरम्यान, या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनधारकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे पर्यायी व्यवस्था म्हणून सदर रस्त्याचे काम तात्काळ इतर गुत्तेदाराकडे सुपूर्द करावे, अशी मागणी करण्यात येत आहे.आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका लक्षात घेता, या रस्त्याच्या कामाचे श्रेय घेण्यासाठीच गुत्तेदार मुद्दाम कामास विलंब लावत असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी केला आहे.**

# बीडचे ज्येष्ठ पत्रकार रईस खान यांना राज्यस्तरीय 'आफताब-ए-सहाफत' पुरस्कार जाहीर

**बीड । दिव्य रिपोर्टर**

गेल्या २५ वर्षांपासून हिंदी, उर्दू व मराठी पत्रकारितेत प्रामाणिकपणे व जबाबदारीने कार्यरत असलेले बीडचे प्रसिद्ध पत्रकार रईस खान सिकंदर खान यांची 'खादिमीन-ए-उम्मत' संस्थेच्या राज्यस्तरीय 'आफताब-ए-सहाफत' (पत्रकारितेचा सूर्य) पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.



या निवडीचे पत्र खादिमीन-ए-उम्मतचे बीड जिल्हा निमंत्रक सय्यद मुमताज अली हाशमी, ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक नदीम मिर्झा तसेच ज्येष्ठ साहित्यिक अरशद सिद्दीकी यांच्या हस्ते बुधवारी देण्यात आले. या पुरस्काराचे वितरण रविवार,१८ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता हैदर गार्डन फंक्शन हॉल माल टेकडी रोड, देग्लूर नाका नांदेड़ येथे एका समारंभात सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार असल्याचे संस्थेच्यावतीने सांगण्यात आले आहे. रईस खान सिकंदर खान यांनी यापूर्वी 'दैनिक औरंगाबाद टाईम्स' (उर्दू), 'दैनिक एहतेमाद' (उर्दू), दैनिक तामीर ( उर्दू), 'दैनिक इन्साफ-ए-आलम' (हिंदी), 'दैनिक अलहिलाल' (उर्दू) तसेच 'औरंगाबाद सिटीजन्स' (हिंदी) चे जिल्हा प्रतिनिधी असून ऑनलाइन मराठी न्यूज वेबसाईट 'महा टाइम्स.इन' आणि 'बीड इन्साफ'चे मुख्य संपादक (चीफ एडिटर) म्हणून कार्यरत असून तसेच म. रा. मराठी पत्रकार संघाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष आहेत.रईसखान यांनी गेल्या २५ वर्षांत त्यांनी आपल्या लेखणीद्वारे राजकीय, सामाजिक, शैक्षणिक तसेच नागरी प्रश्नांवर जनतेचा बुलंद आवाज मांडला. त्यांच्या दीर्घकालीन व उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा राज्यस्तरीय सन्मान जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्कारामुळे पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# अवमान प्रकरणी राधेश्याम अट्टलसह ट्रस्टींना नोटीस

## लक्ष्मीनारायण मंदिर प्रकरणात कायदेशीर कारवाई निर्णायक टप्प्यात

### दिशाभूल'' म्हणणारे तोंडघशी; रामनाथ खोड यांचे आरोप ठरले तथ्याधारित

**बीड । दिव्य रिपोर्टर**

गेवराई येथील श्री लक्ष्मीनारायण मंदिर हे नोंदणीकृत सार्वजनिक न्यास असून, या न्यासाच्या मालकीची मौजे कोल्हेर व मौजे लुकामसला येथे एकूण १२१ एकर जमीन आहे. मौजे कोल्हेर येथील जमीन सर्व्हे नं. ६ व ८ तर मौजे लुकामसला येथील जमीन सर्व्हे नं. ३३ व ३८ अशी नोंद आहे. सदर जमीन देवस्थानच्या मालकीची असताना तिच्या उत्पन्नाचा लाभ देवस्थानाऐवजी खाजगी व्यक्तींच्या खात्यात जात असल्याचे गंभीर आरोप यापूर्वी समोर आले होते.

या कथित भ्रष्टाचारासंदर्भात रामनाथ खोड यांनी दिनांक २१/११/२०२५ रोजी तक्रार दाखल केली होती. त्या तक्रारीवर धर्मदाय उप आयुक्त यांनी आदेश पारित केले होते. या आदेशाला मा. उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. मात्र मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी धर्मदाय उप आयुक्त यांच्या आदेशाला स्थगिती देत, मा. सहाय्यक धर्मदाय आयुक्त, बीड यांनी दिनांक ०५/०४/२०२१ रोजी दिलेला आदेश कायम ठेवला. सदर निर्णय मा. उच्च न्यायालयाने दिनांक ०९/१२/२०२५ रोजी दिलेल्या आदेशान्वये स्पष्ट केला आहे.असे असतानाही न्यायालयीन आदेशांचे उल्लंघन करून देवस्थान जमिनीतील ऊस परस्पर तोडून कारखान्याला घालण्यात आल्याचा गंभीर आरोप पुढे आला आहे. या पार्श्वभूमीवर न्यायालयीन आदेशाचा अवमान झाल्याचा ठपका ठेवत धर्मदाय प्रशासनाने कारवाई सुरू केली आहे.या अवमान प्रकरणी राधेश्याम अट्टल यांच्यासह संबंधित ट्रस्टींना अधिकृत नोटीस बजावण्यात आली असून, महाराष्ट्र सार्वजनिक न्यास व्यवस्थापन अधिनियम, १९५० अंतर्गत पुढील कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे ''रामनाथ खोड दिशाभूल करत आहेत'' असा दावा करणारे आरोप पूर्णतः फोल ठरले असून, संपूर्ण प्रकरण न्यायालयीन आदेश व दस्तऐवजांच्या आधारे पुढे सरकत असल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणामुळे सार्वजनिक न्यासांच्या मालमत्तेचे संरक्षण तसेच न्यायालयीन आदेशांच्या काटेकोर अंमलबजावणीचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.



# लोकहिताच्या योजनांचा सर्वसामान्यांना सुलभ लाभ द्या -आ.विजयसिंह पंडित

## विविध योजनांचा गेवराई तहसिल कार्यालयात आ. पंडित यांच्याकडून आढावा



**गेवराई । दिव्य रिपोर्टर**

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना, निराधार योजना, फार्मर आयडी संदर्भातील समस्या, रेशन कार्ड, मग्रारोहयो मधून रेशीम शेतीसाठी अनुदान, लाडकी बहिण योजनेतील लाभार्थ्यांची अडचणी, शेतरस्ते व वस्त्यांना जोडणाऱ्या रस्त्यांची प्रलंबित प्रकरणे आदी बाबत आ. विजयसिंह पंडित यांनी गेवराई तहसिल कार्यालयात आढावा घेतला. शासनाच्या लोकहिताच्या योजनांचा सर्वसामान्य लाभार्थ्यांना सुलभ व सहज लाभ देणे बाबत त्यांनी सूचना दिल्या. यावेळी त्यांच्या शुभहस्ते अनेक लाभार्थ्यांना मंजुरी पत्राचे वितरण करण्यात आले. तहसिलदार संदिप खोमणे, तालुका कृषी अधिकारी सचिन गिरी यांच्यासह महसुल व कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी व लाभार्थी यावेळी उपस्थित होते.

गेवराई विधानसभा मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी शुक्रवार, दि.१६ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता गेवराई तहसिल कार्यालयात विविध शासकीय योजनांचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासनाच्या विविध लोकहिताच्या योजनांचा सर्वसामान्यांना सुलभ लाभ देण्याच्या सूचना केल्या. यावेळी तहसिलदार संदिप खोमणे, तालुका कृषी अधिकारी सचिन गिरी, नायब तहसिलदार संजय सोनवणे, गजानन मोरे, श्रीमती कुटे यांच्यासह महसुल व कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी व लाभार्थी उपस्थित होते. गेवराई येथे लवकरच रेशीम पार्क उभारण्यात येणार असल्यामुळे रेशीम शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी मग्रारोहयोमधून तुती लागवडीकरीता प्रकरणे प्रलंबित न ठेवता तात्काळ मंजुर करण्याच्या आ. पंडित यांनी सूचना केल्या. सुमारे ९७.३९ कोटी रुपयांचा निधी या योजनेतून मंजुर करण्यात आला असून २३७८ एकर क्षेत्रावर तुतीची लागवड मग्रारोहयो मधून करण्यात येणार असल्याबाबत बैठकीत चर्चा झाली. रेशन कार्डच्या संदर्भाने येणाऱ्या तक्रारीवर तात्काळ उपाययोजना करण्याच्या सूचना आ. पंडित यांनी बैठकीत दिल्या. या बाबतचे इष्टांक वाढविण्यासाठी केलेल्या पाठपुराव्याला यश आल्यामुळे एपीएल, अंत्योदय, एनपीएच साठी पुरेसे रेशन कार्ड उपलब्ध होवू शकले असून पीएचएफ साठी १०,२०० चा इष्टांक वाढवून देणे बाबत यावेळी चर्चा झाली.

# सिद्धांत गायकवाड खुन प्रकरण जुन्या वादातून पळवून नेवुन खुन केल्या प्रकरणी दोन आरोपींना जन्मठेपेची शिक्षा

## मा. श्री आनंद एल यावलकर साहेब, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड यांचा महत्त्वपूर्ण निकाल

**बीड । दिव्य रिपोर्टर**

सिद्धांत किरण गायकवाड, रा बारादरी, यादवमळा, माळीवेस, बीड यास जुन्या वादावरून पळवून नेवुन त्याचा खून केल्याप्रकरणी आरोपी अक्षय उर्फ चिंटू मिंटू गायकवाड रा. पाजुड गल्ली, मालिवेस, बीड व अभिषेक सचिन उर्फ पिंटु गायकवाड रा. बालाजी नगर, नांदेड यांना प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री आनंद एल यावलकर साहेब बीड यानी दि. १३/०१/२०२६ रोजी दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.

प्रस्तुत प्रकरणातील थोडक्यात हकीकत अशी की, फिर्यादी किरण गायकवाड़ रा. बारादरी, यादवमळा, बीड यांचा मुलगा सिद्धांत किरण गायकवाड, वय - २० वर्ष यास जुन्या वादाच्या कारणावरून त्याच्या घरापासून दिनांक ०२/०७/२०२२ रोजी दुपारी ०३:३० वा सुमारास आरोपी अक्षय उर्फ चिंदु मिंटू गायकवाड व अभिषेक सचिन उर्फ पिंदु गायकवाड यांनी मोटार सायकलवर बसवन घेबुन जाउन खंडेश्वरी, बीड परिसरातील जिजामाता विद्यालयातील पड़क्या रूममध्ये घेवून जाउन तेथे त्यास लाकडी काठयाने व बेल्टने जिवे मारण्याच्या उद्देशाने जबर मारहाण केली. या कारणावरून उपरोक्त फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बीड शहर पोलीस स्टेशन येथे गुरु कं १०७/२०२२ कलम ३०७,३६४,३४ भादवी प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. सदर जखमी यास सुरवातीला फाकु नाना हॉस्पिटल, बीड व नंतर ससुन हॉस्पिटल, पुणे येथे दाखल करण्यात आले होते व उपचारादरम्यान त्याचा मृत्यु झाल्यावरून प्रकरणात कलम ३०२ भादवी वाढवण्यात आले. सदर गुन्ह्याचा तपास पी.यु अंधारे, पोलीस उपनिरीक्षक, बीड शहर पोलीस स्टेशन यांनी केला. गुन्ह्याच्या तपासाच्या कामी दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली त्याचबरोबर साक्षीदाराचे जबाब व इतर परिस्थितीजन्य पुरावा मिळून आल्यावरून दोन्ही आरोपीविरुद्ध भादवी कलम ३०२,३०७.३६४,३४ भादवी प्रमाणे दोषारोप पत्र मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी बीड यांच्याकडे दाखल करण्यात आले व त्यानंतर सदरचे प्रकरण हे सुनावणीसाठी सत्र न्यायालय बीड येथे वर्ग करण्यात आले. सदर प्रकरणाची सुनावणी तात्कालीन जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. के. आर.जोगलेकर साहेब व त्यानंतर प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. आनंद एल. यावलकर साहेब बीड यांच्या समोर झाली. सदर प्रकरणी आरोपी विरुद्ध गुन्हा सिद्ध करण्यासाठी सरकार पक्षातर्फे एकुण १५ साक्षीदार तपासण्यात आले. प्रकरणात फिर्यादी व साक्षीदार यांचे जबाब, वैद्यकिय पुरावा व इतर परिस्थीतीजन्य पुरावा यांचे अवलोकन करून व जिल्हा सरकारी वकिल तथा शासकीय अभियोक्ता ॲड. अजय दि. राख यांचा युक्तिवाद ग्राह्य धरून प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री आनंद एल. यावलकर साहेब यांनी दोन्ही आरोपी अक्षय उर्फ बिंदु निंदू गायकवाड़ रा. पाजुड़ गल्ली, माळवेस, बीड व अभिषेक सचिन उर्फ पिंटु गायकवाड रा. बालाजी नगर, नांदेड यांना भादवी कलम ३०२,३४ प्रमाणे दोषी धरून जन्मठेपेची शिक्षा सुनावली तसेच भादवी कलम ३६४.३४ प्रमाणे दोषी धरून ७ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे व दोन्ही शिक्षा एकत्रित भोगायची आहे. सदर प्रकरणी सरकारपक्षातर्फे जिल्हा सरकारी वकिल तथा शासकीय अभियोक्ता ॲड. अजय दि. राख यांनी काम पाहिले. त्यांना सहा. सरकारी वकिल बी.एस.राख, व सहा. सरकारी वकिल ए.बी.तिडके व फिर्यादी तर्फे ॲड. एस.एस. सावंत यांनी सहकार्य केले, सदर प्रकरणात पैरवी अधिकारी म्हणून पोलीस कर्मचारी सुरेश कदम व श्री एम.व्ही नागमवाड यांनी सहकार्य केले.



# अनाधिकृत भागशाळा सुरु ठेवण्यासाठी त्या उर्दू शिक्षणसंस्थेचे षडयंत्र !




**अनाधिकृत भागशाळा संदर्भातचे गटशिक्षणाधिकारी यांच्या हस्ते सादर केलेले कागदपत्र संशयाच्या विळख्यात**

» १९७४ साली तत्कालीन शिक्षणाधिकारी यांनी तुकडी चालविण्यासाठी दिलेले ते पत्र एडिट केल्याचा संशय तर १९७७ सालीचे पत्रही बनावट असल्याची शंका

**प्राथमिक शिक्षणाधिकारी किरण कुँवर यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न दिव्य आधारने हाणून पाडला**

» **शिक्षण उपसंचालक यांनी त्या शिक्षणसंस्थेच्या अनाधिकृत भागशाळांवर एक लाख रुपये दंडात्मक कारवाई करण्याचे दिले होते आदेश तरी या अनाधिकृत भागशाळा सुरू राहिल्या तर प्रति दिवस दहा हजार रुपये दंडात्मक कारवाई करण्याचे त्या पत्रात नमूद**



# आता त्या षडयंत्राच्या चक्रव्यूहात ती शिक्षणसंस्था अडकणार



ग्राऊंड रिपोर्टर
दिव्य आधार
शेख रिजवान
9561840184

**दिव्य आधारच्या प्रतिनिधीने जिल्हा परिषद सीईओ जितिन रहेमान यांची भेट घेवून त्या शिक्षणसंस्थेच्या अनाधिकृत भागशाळासंदर्भात सविस्तर माहिती दिल्यानंतर अनाधिकृत भागशाळाचे सर्व पुरावे सादर करण्याचे त्यांनी केले सुचित**

**जरी भालदारपुरा व बालेपीर परिसरात तुकड्या सुरु करण्याची परवानगी दिलेली असली तरी त्या शिक्षणसंस्थेने चक्क अनाधिकृत भागशाळेच्या नावावर भालदारपुरा व बालेपीर परिसरात प्राथमिक व माध्यमिक शाळा सुरू केल्याचे चित्र**

बीड :

मागील अनेक दिवसांपासून दिव्य आधारने काही उर्दू शिक्षणसंस्थेच्या अनाधिकृत भागशाळेचा मुद्दा लावून धरलेला आहे. विशेष म्हणजे २०१० सालचे तत्कालीन शिक्षणाधिकारी यांनी या उर्दू शिक्षणसंस्थेच्या भागशाळांची तपासणी करून सदरील भागशाळा अनाधिकृत असल्याचा अहवाल देवून या शाळा तात्काळ बंद कराव्यात व या शाळेत शिकविणाऱ्या शिक्षकांचा पगारही बंद करावा अशा सूचना दिल्या होत्या. तरीही त्या अनाधिकृत भागशाळा आजही सुरूच आहेत. दिव्य आधारने यासंदर्भात पाठपुरावा केल्यानंतर गटशिक्षणाधिकारी यांनी याची दखल घेत संबंधित शिक्षणसंस्थेला भालदारपुरा, बालेपीर व गांधीनगर परिसरातील भागशाळा कोणत्या आधारावर सुरू असल्याचे पत्रव्यवहार करून विचारणा केली असता संबंधित शिक्षणसंस्थेने काही कागदपत्रे गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे सादर करून सदरील भागशाळा या कागदपत्राच्या आधारावर सुरू असल्याचे सांगितले. यात गांधीनगर परिसरातील ती भागशाळा नसून त्याठिकाणी गांधीनगर परिसरातील विद्यार्थी गोळा करून त्या विद्यार्थ्यांना मोटार वाहनाने शिक्षणासाठी त्या उर्दू शिक्षणसंस्थेच्या मुख्य शाळेत आणले जात असल्याचे सांगण्यात आले. तसेच भालदारपुरा परिसरातील भागशाळा १९७४ चे शिक्षणाधिकारी यांनी भागशाळा सुरू करण्यासंदर्भात पत्र दिले असल्याचे सांगून त्या पत्राच्या आधारावर भागशाळा सुरू असल्याचे सांगण्यात आले. तसेच १९७७ साली बालेपीर परिसरात शाळा सुरू करा म्हणून त्या काळातील शिक्षणाधिकारी यांनी पत्र दिल्याचेही त्या शिक्षणसंस्थेने सांगून गटशिक्षणाधिकारी यांना काही पत्रव्यवहार करून त्या भागशाळा कोणत्या आधारावर सुरू आहे असे पत्र सादर केले. परंतु दिव्य आधारने त्या १९७४ च्या पत्राची पडताळणी केली असता ते १९७४ चे पत्र एडिट केल्याची शंका असून १९७७ चे पत्रही बनावट असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या अनुषंगाने दिव्य आधारच्या प्रतिनिधीने शुक्रवारी सकाळी जिल्हा परिषद सीईओ जितिन रहेमान यांची भेट घेवून सर्व प्रकरण सांगितल्यानंतर जितिन रहेमान यांनी याबाबत विशेष लक्ष देण्याचे आश्वासन देवून अनाधिकृत भागशाळा संदर्भात जे काही पुरावे दिव्य आधारकडे आहेत ते सादर करण्याचे सुचित केले. विशेष म्हणजे अनाधिकृत भागशाळा म्हणजे काय? याचीही पूर्ण माहिती सीईओ जितिन रहेमान यांनी सविस्तर ऐकूण घेतली. दिव्य आधार लवकरच याप्रकरणी सीईओ यांच्याकडे सर्व पुरावे सादर करणार असून विशेष म्हणजे ती शिक्षणसंस्था स्वत:च्या षडयंत्राच्या चक्रव्यूहात अडकणार असल्याचे दिसून येत आहे.

सन १९७४ या सालचे शिक्षणाधिकारी यांनी संबंधित उर्दू शिक्षणसंस्थेला भालदारपुरा परिसरात तुकडी चालविण्यासाठी परवानगी दिली असल्याचे पत्र त्या शिक्षणसंस्थेने दिले असले तरी २०१० चे तत्कालीन शिक्षणाधिकारी यांनी भालदारपुरा, गांधीनगर व बालेपीर परिसरातील भागशाळा अनाधिकृत असल्याचा अहवाल देत सदरील शाळेत शिकविणाऱ्या शिक्षकांचा पगार बंद करण्यात येईल असा स्पष्ट अहवाल दिला होता. विशेष म्हणजे त्या अहवालाची दखल घेत शिक्षण उपसंचालक यांनी सदरील अनाधिकृत भागशाळेवर एक लाख रुपयांची दंडात्मक कारवाई करून जर ती शाळा पुन्हा सुरू राहिली तर प्रति दिवस दहा हजार रुपये दंड असा लेखी आदेश बीड शिक्षणाधिकारी यांना दिला होता. परंतु त्या अनाधिकृत भागशाळा आजही सर्रास सुरू आहेत. विशेष म्हणजे बालेपीर, रोशनपुरा परिसरात जिल्हा परिषदच्या दोन उर्दू शाळा असतानाही या अनाधिकृत भागशाळेला मंजूरी कशी देण्यात आली? हा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होत असून या अनाधिकृत भागशाळेमुळे जिल्हा परिषदच्या शाळा बंदच्या मार्गावर आहेत. पूर्वी बालेपीर परिसरातील त्या शिक्षणसंस्थेची उर्दू शाळा चाऊस गल्लीत होती, त्यानंतर सदरील शाळा प्रशासनाने शाळा स्थलांतरीत करण्याची परवानगी मागवून कोणतीही परवानगी शिक्षणविभागाने दिलेली नसताना संबंधिताने चाऊस गल्लीतील ती उर्दू शाळा बालेपीर परिसरातील रोशनपुरा येथे हलविली. विशेष म्हणजे रोशनपुरा परिसरात जिल्हा परिषद उर्दूच्या दोन शाळा असतानाही ही अनाधिकृत भागशाळा पुन्हा त्याच ठिकाणी सुरू करणे म्हणजे डिस्टन्स कायद्याची पायमल्ली होत आहे. सदरील बाब गटशिक्षणाधिकारी, शिक्षणविस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख यांना माहिती असतानाही संबंधितांनी त्या अनाधिकृत भागशाळेकडे दुर्लक्ष केल्याचे स्पष्ट दिसून येत असून याप्रकरणी प्राथमिक शिक्षणाधिकारी यांचीही दिशाभूल गटशिक्षण विभागातून होत असल्याचे दिसून येत असल्याने दिव्य आधारच्या प्रतिनिधीने याप्रकरणी थेट सीईओंना माहिती दिली असून आता सीईओ जितिन रहेमान याप्रकरणी पुढे काय कारवाई करतील याकडे विशेष लक्ष राहणार आहे.

## त्या शिक्षणसंस्थेचे षडयंत्र

सदरील अनाधिकृत भागशाळा कोणत्या आधारावर सुरू आहे असा पत्रव्यवहार गटशिक्षणाधिकारी यांनी केल्यानंतर संबंधित त्या शिक्षणसंस्थेने गटशिक्षणाधिकारी यांना काही पत्र सादर केलीत. यात १९७४ चे गटशिक्षणाधिकारी यांचे पत्र असून या पत्रात भालदारपुरा परिसरात तुकडीवर्ग चालविण्यासाठी परवानगी देण्यात आली होती. तर बालेपीर परिसरातील भागशाळा १९७७ चे शिक्षणाधिकारी यांच्या पत्राच्या आधारावर सुरू असल्याचे कागदपत्रेही संबंधित शिक्षणसंस्थेने सादर केले आहे. विशेष म्हणजे १९७४ चे पत्र एडिट करून गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे सादर केल्याचे दिसून येते. दिव्य आधारच्या हाती लागलेल्या पत्रावरील १९७४ चे तत्कालीन शिक्षणाधिकारी यांची स्वाक्षरी आणि त्या पत्रावरील मुख्याध्यापकाची स्वाक्षरी व त्या पत्रातील काही मजकूर आणि गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे संबंधित शिक्षणसंस्थेने १९७४ चे दाखल केलेले पत्र याच्यात मोठी तफावत दिसून येत आहे. तसेच १९७७ चे पत्रही संशयास्पद असून त्या पत्रावर आवक-जावक क्रमांक दिसून येत नाही. एवढेच नव्हे तर शिक्षणाधिकारी यांची स्वाक्षरीही संशयास्पद वाटते. अशाप्रकारे संबंधित शिक्षणसंस्थेने गटशिक्षणाधिकारी यांच्या हस्ते सादर केलेले कागदपत्रे संशयास्पद असून शिक्षणाधिकारी यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न असल्याचे दिसून येते परंतु दिव्य आधारने हा प्रयत्न हाणून पाडला हे मात्र खरे आहे. एकंदरीत हे दोन्ही पत्र संशयास्पद असून संबंधित शिक्षणसंस्थेने अनाधिकृत भागशाळा सुरू ठेवण्यासाठी हे षडयंत्र केले असल्याचे दिसून येत असून दिव्य आधार पुढच्या अंकात या पत्राचा मोठा खुलासा करणार यात काही शंका नाही.

## तुकड्यातही घोळ, त्या चौकशी अहवालाचे काय झाले?

संबंधित उर्दू शाळेत बोगसगिरी व अनियमितता बाबत २०१८ साली चौकशी समिती स्थापन करण्यात आली होती. या चौकशी समितीत उपशिक्षणाधिकारी व दोन शिक्षण विस्तार अधिकारी अशाप्रकारे त्रिसदस्यीय समिती स्थापन करून त्या उर्दू शाळेची चौकशी करण्यात आली होती. संबंधित चौकशी समितीने चौकशी करून अहवाल दिल्यानंतर सदरील शाळेत शैक्षणिक वर्षे २०११-१२ च्या संच मान्यतेमध्ये अठरा तुकड्या मंजूर आहेत परंतु शैक्षणिक वर्षे २०१२-१३ च्या संच मान्यतेत अठरा तुकड्याऐवजी १९ तुकड्या मंजूर झाल्याचे दिसतात. सदरील शाळेची एक तुकडी कशी वाढली याबाबत कोणताही पुरावा संबंधित शाळेकडे उपलब्ध नसल्याचे चौकशी अहवालात नमूद आहे. तसेच प्राथमिक शाळा मुलींची व प्राथमिक शाळा मुलांची या दोन्ही शाळेला इयत्ता पहिली ते चौशीपर्यंत वर्ग मान्य असल्याने बालेपीर भागशाळेत सदरील शाळांची पाचवी ते सातवीचे वर्ग चालविण्याचा प्रश्नच नाही. संबंधित चौकशी समितीने सदरील शाळेला भेट दिली असता पाचवी व सातवीचे विद्यार्थी शाळेत उपस्थित नव्हते. अशाप्रकारे २०१८ साली चौकशी समितीने त्या शाळेसंदर्भात अहवाल देवून गंभीर आरोप लावले होते. त्या चौकशी अहवालाचे काय झाले? याचाही शिक्षणाधिकारी यांनी पाठपुरावा करण्याची गरज आहे.

●तुकड्यातही मोठा घोळ घातल्याचा संशय, २०१८ या वर्षी त्या शिक्षणसंस्थेच्या शाळेची त्रिसदस्यीय समितीने चौकशी केली होती, त्या चौकशी अहवालात सन २०११-१२ या वर्षीच्या संच मान्यतेत त्या उर्दू शाळेला १८ तुकड्या मंजूर परंतु शैक्षणिक वर्षे २०१२-१३ या वर्षीच्या संच मान्यतेत १९ तुकड्यांना मंजुरी मिळाल्याचे दिसून येते, त्यात एक तुकडी कशी वाढली याचा कोणताच पुरावा त्या शिक्षणसंस्थेकडे नाही

●त्या शिक्षणसंस्थेच्या उर्दू प्राथमिक शाळा मुलांची व उर्दू प्राथमिक शाळा मुलींची या दोन्ही शाळांना इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत वर्ग मान्य असल्याने बालेपीरच्या अनाधिकृत भागशाळेत पाचवी ते सातवीपर्यंत तुकडी वर्ग चालविण्याचा प्रश्नच येत नाही असे त्या चौकशी अहवालात स्पष्ट नमूद तर मग बालेपीरची अनाधिकृत भागशाळा कशी सुरू?

●सन २०१० चे तत्कालीन शिक्षणाधिकारी यांनी भालदारपुरा, गांधीनगर व बालेपीर परिसरातील त्या शिक्षणसंस्थेच्या भागशाळा अनाधिकृत असल्याचा अहवाल दिला होता, त्या काळातीलच शिक्षण उपसंचालक यांनी या अनाधिकृत भागशाळा बंद नाही झाल्या तर दंडात्मक कारवाईचे आदेश दिले होते तरीही त्या अनाधिकृत भागशाळा आजही सुरू याला जबाबदार गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख असल्याचे दिसून येत असून या अनाधिकृत भागशाळांना

●कुलूप लावून संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करणे गरजेचे

गांधीनगर ते त्या उर्दू शिक्षण संस्थेची मुख्य शाळा अंदाजे पाच कि.मी.च्या अंतरावर तर मग गांधीनगर परिसरातील विद्यार्थी गोळा करून मुख्य शाळेत घेवून जाणे कितपत योग्य? गांधीनगरमधील जिल्हा परिषदच्या उर्दू शाळेवर याचा परिणाम होणार नाही का? याचीही शिक्षणविभागाने काळजी घेणे गरजेचे

## उपशिक्षणसंचालक यांच्या पत्राच्या आधारावर कारवाई झाली तर कोट्यवधीचा दंड त्या शिक्षणसंस्थेला भरावा लागेल

तत्कालीन शिक्षणाधिकारी यांनी २०१० साली संबंधित भागशाळांची तपासणी करून सदरील भागशाळा अनाधिकृत असल्याचा अहवाल दिला होता. त्या अहवालाची प्रत उपशिक्षणसंचालक यांच्याकडे पाठविण्यात आली होती. उपशिक्षणसंचालक यांनी सदरील भागशाळेसंदर्भात गंभीर दखल घेवून सदरील भागशाळा अनाधिकृत जर आहे तर त्यांना एक लाखापर्यंतची दंडात्मक कारवाईचे आदेश दिले होते आणि ती भागशाळा तरीपण सुरू असेल तर प्रति दिवशी दहा हजार रुपये प्रमाणे दंडाची तरतूद असल्याचेही त्या पत्रात नमूद आहे. जर उपशिक्षणसंचालक यांच्या त्या पत्राचा पाठपुरावा केला तर प्रति दिवस दहा हजार रुपये प्रमाणे संबंधित शिक्षणसंस्थेवर अंदाजे ३० ते ४० कोटी रुपयांचा दंड भरण्याची वेळ येणार असल्याचे दिसून येते. यासाठी शिक्षणविभागाने गांभीर्याने पाठपुरावा करण्याची गरज आहे. तसेच गटशिक्षणाधिकारी यांची कार्यप्रणाली संशयास्पद असून शिक्षणाधिकारी किरण कुँवर मॅडम यांनी या अनाधिकृत भागशाळेसंदर्भात विशेष पथक नेमूण चौकशी करणे योग्य वाटते.

# बीड ते नाळवंडी रस्त्याच्या निकृष्ट कामावरुन भाजप युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर आक्रमक

**बीड I दिव्य रिपोर्टर**

शहराजवळील नाळवंडी नाका ते नाळवंडी रस्त्याचा प्रश्न गेल्या २० वर्षांपासून प्रलंबित आहे. या रस्त्यासाठी ग्रामस्थांनी अनेक आंदोलने केली. त्यानंतर आता जिल्हा नियोजन समितीतून निधी मंजूर झाला. मात्र सुरू असलेले काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याच्या तक्रारी होत्या. या परिसरात मोठ्या प्रमाणावर खडी क्रेशरची जड वाहतूक सुरू असल्यामुळे सध्या होत असलेले काम फार काळ टिकणार नाही, अशी तक्रार ग्रामस्थांनी भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्याकडे केली. त्यानंतर त्यांनी शुक्रवारी (दि.१६) रस्त्याची पाहणी केली. काम दर्जेदार होणार नसेल तर बंद पाडण्याचा इशारा संबंधित अधिकाऱ्यांना दिला आहे.

यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी इंजि.चोपडे व पोकळे यांना कामाच्या दर्जाबाबत सूचना केल्या. शासनाच्या निकषांनुसार व गुणवत्तापूर्ण पद्धतीने काम न झाल्यास सदर काम तात्काळ बंद पाडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला. यावेळी उध्दवराव मेहेत्रे, भाऊसाहेब सुरवसे, लक्ष्मीआई तांडाचे सरपंच स्वरूप राठोड (नाळवंडी), गणेश राऊत, जुजगव्हानचे सरपंच रवी गंगावणे, संजय बापू काळे, आत्माराम सोनवणे, अशोक सोनवणे, नामदेव म्हेत्रे, रोहित राऊत, राघोजी राऊत, राजू पटेल, बाळू आमटे, घोडके, अभिमान गुंदेकर, विकास यादव, प्रशांत जाधव, मधुकर राऊत, दत्तप्रसाद सानप, बाबासाहेब काळे, युनूस शेख यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ग्रामस्थांनी पुढील टप्प्यात हा रस्ता सिमेंट काँक्रीटीकरणाचा करून द्यावा, तसेच या कामासाठी पाठपुरावा करावा, अशीही मागणी केली.



**काम दर्जेदार होणार नसेल तर बंद पाडण्याचा इशारा**

# दर्जेदार खडीकरण व मुरूम रस्ता झाल्याने जीवघेणा प्रवास थांबला

**बीड I दिव्य रिपोर्टर**

गुडघ्याएवढे खड्डे वाहन तर सोडाच निट पायी चालता येत नव्हते, एकंदरीत त्या रस्त्याची भयान अवस्था झाली होती. परंतु चिंचोलीमाळी व नाळवंडी ग्रामस्थांना या रस्त्याशिवाय पर्याय नव्हता. दुचाकीने प्रवास करताना खड्ड्यात गाडी आदळल्याने अनेक ग्रामस्थ कंबरेच्या आजाराने त्रस्त झाले होते. शेवटी जिल्हा वार्षिक योजना ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण यातून या रस्त्याला मुबलक निधी प्राप्त झाला. नियमाने टेंडर काढून एका एजन्सीला हे काम देण्यात आले. गुडघ्याएवढे खड्डे मुरूमाने भरता भरता गुत्तेदारही वैतागला. शेवटी हा रस्ता ग्रामस्थांसाठी खुला करण्यात आला. दर्जेदार खडीकरण व मुरूम टाकून तयार झालेल्या या रस्त्यामुळे त्या परिसरातील ग्रामस्थांचा जीवघेणा प्रवास अखेर थांबला. चिंचोलीमाळी-नाळवंडी ग्रामस्थांना जिल्हा वार्षिक योजनेतून मोठा दिलासा मिळाला.

जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण यातून चिंचोलीमाळी-नाळवंडी रस्त्याच्या कामाला मुबलक निधी मिळाल्यानंतर सदरील रस्ता तयार करून घेण्याची जबाबदारी जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्रमांक १ वर सोपविण्यात आली. नियमाने एका एजन्सीला या रस्त्याचे काम देण्यात आले. त्या रस्त्यात मोठमोठे खड्डे असल्याने सुरुवातीपासूनच मुरूमाचा भर टाकून कसेबसे खड्डे बुजविण्यात आले. संबंधित गुत्तेदाराने नंतर खडीकरणचे लेअर टाकून दबाई केली, दबाई केल्यानंतर रस्ता पुन्हा खचत होता, त्याच्यावर मुरूम टाकून पुन्हा भरणा केला व पाण्याचा शिरकाव करून पुन्हा रोलरने रस्ता दाबण्यात आला. अशाप्रकारे मोठ्या प्रमाणात मुरूम टाकून त्यानंतर खडीची लेअर टाकून रस्ता दाबून घेतला. त्यानंतर मुरूमाचा लेअर टाकून रोलरने दबाई केली. अशाप्रकारे दर्जेदार रस्ता तयार झाला. या रस्त्याचा चिंचोलीमाळी व नाळवंडी ग्रामस्थांना मोठा फायदा होणार असून भविष्यात हा रस्ता डांबरीकरणही होणार आहे.





**चिंचोलीमाळी-नाळवंडी ग्रामस्थांना दिलासा**

## लवकरच डांबरीकरणही होणार

त्या रस्त्याने निट चालताही येत नव्हते. ग्रामस्थ कसेबसे दुचाकीने त्या रस्त्यावरून प्रवास करत असताना त्यांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. शेवटी वार्षिक नियोजन योजनेतून या रस्त्याच्या कामाला मंजूरी मिळाली. जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता व शाखा अभियंता यांच्या मार्गदर्शनाखाली या रस्त्याचे काम सुरू झाले. संबंधित एजन्सीने नियमाने खडीकरण व मुरूम टाकून दबाई केली. त्यामुळे रस्त्याचे काम दर्जेदार झाले असल्याचे दिसून येते. लवकरच या रस्त्यावर डांबरीकरण होणार असल्याची माहिती मिळाली असून डांबरीकरण झाल्यानंतर या रस्त्याचा ग्रामस्थांना मोठा फायदा होणार यात काही शंका नाही.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक शेख रिजवान खलील यांनी माऊली ऑफसेट माळीवेस, बीड ता. जि. बीड ४३१ १२२ येथे छापून साप्ताहिक दिव्य आधार कार्यालय बशीरगंज, जयहिंद प्लाझा, नगरपालिकेजवळ, बीड ता. जि. बीड ४३१ १२२ येथे प्रकाशित केले आहे. मो. ९५६१८४०१८४ या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखास संपादक सहमत असतीलच असे नाही, वाद-विवाद बीड न्यायालय अंतर्गत.